जनसंपर्क अधिकारी
पोलीस आयुक्त, मिरा-भाईदर वसई-विरार यांचेकार्यालय
रामनगर,सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे
दुरध्वनीक्र. ०२२-२९४५१००१ mail :pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेसनोट क्र.- ४४ दिनांक ०२/०३/२०२१

# खुन व ०२ जबरी चोरीचे गुन्हयाचा तुळींज पोलीसांनी २४ तासात केला उलघडा

०१/०३/२०२१ रोजी पहाटे चे सुमारास नालासोपारा पुर्व, संखेश्वर नगर रामा मेडीकलच्या जवळ गल्लीत फिर्यादीचा भाउ शैलेश देवेंद्र पाठक, वय ४४ वर्षे, रा. संखेश्वर नगर नालासोपारा पुर्व, मुळ रा. बिहार राज्य यास कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणा वरुन कोणत्यातरी धारदार हत्याराने शरीरावर वार करुन जिवे ठार मारले, अशा फिर्यादीचे तक्रारीवरुन तुळींज पोलीस ठाणे येथे गु.र.न. २९१/२०२०१ भादवि कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

गुन्हयाचे घटनेची माहिती मिळताच लागलीच तुळींज पोलीसांनी वरिष्ठांचे मार्गदर्शनात सदर गुन्हयाचा तपास सुरु करुण तांत्रीक व गोपणीय माहितीचे आधारे तपास करुण २४ तासात आरोपी निष्पन्न करुण आरोपी १) हितेश मंगेश भोसले, रा. संखेश्वर नगर नालासोपारा पुर्व, व त्याचे ०२ अल्पवयीन साथीदार यांना ताब्यात घेवुन तपास केला असता सदर गुन्हयातील फिर्यादीचा भाउ मुंबई येथे जानेकरीता निघाला नालासोपारा पुर्व, संखेश्वर नगर रामा मेडीकलच्या जवळ गल्लीतुन जात असतांना फिर्यादीचे भावाचा आरोपींस धक्का लागल्याचे कारणा वरुन आरोपींनी त्यास चाकुने वार करुण ठार केले. असे प्राथमीक तपासात निष्पन्न झाले.

तसेच वरील गुन्हा करण्या पुर्वी दिनांक ०१/०३/२०२१ चे पहाटेच तुळींज पोलीस ठाणे येथील गु.र.नं. २९३/२०२१ भादवि कलम ३९४, ३४ मध्ये नालासोपारा पुर्व नवनीत हॉस्पीटलचे बाजुला फिर्यादी वय ३२ वर्षे, रा. निळे गांव, नालासोपारा पश्चिम यांना आरोपीने टाईम क्या हुआ है असे विचारुन फिर्यादीचे समोर येवुन फिर्यादीवर धारदार चाकुने हल्ला करुन फिर्यादीचे खिशातील ५०० रु., सॅमसंग कंपनीचा मोबाईल जबरदस्तीने काढुन जबरीने चोरुन नेले, तसेच गु.र.नं. गु.र.नं. २९३/२०२१ भादवि कलम ३९४, ३४ मध्ये संकेश्वर नगर येथील कचरपट्टी जवळील मनसे ऑफीस चे जवळ नालासोपारा पुर्व येथे फिर्यादी वय ६८ वर्षे, रा. संकेश्वर नगर, नालासोपारा पश्चिम हे त्यांचे राहते घरुन नालासोपारा रेल्वे स्टेशन येथे पायी चालत जात असतांना आरोपींनी चाकुने मारण्याचा धाक दाखवुन ठोशा बुक्यांनी मारहाण करुन फिर्यादीचे शर्टाचे खिशातील ४० रुपये व सॅमसंग कंपनीचा मोबाईल फोन जबरीने चोरुन नेले. असे ०२ जबरी चोरीचे गुन्हे केले असल्याचे निष्पन्न झाले.

सदरची कामगीरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त तुळींज विभाग, वपोनि/राजेंद्र कांबळे यांचे मार्गदर्शनात पोनि/गौळी, सपोनि/संदेश पालांडे, पोउपनि/ठाणेश्वर कोकाटे, सफौ/बाळु बादल, पोना/राकेश सिरसाठ, आनंद मोरे, पोशि/शशिकांत पोटे, योगेश नागरे, ईस्माईल छपरीबन, अश्पाक जमादार, विनायक राउत यांनी केली आहे.